# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**Pune Metropolitan Region Development Authority, Pune**

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी,पुणे-४४

Ph. No.020-27659855, Email: dyceoadm@gmail.com

जमीन व मालमत्ता विभाग

नियोजनबद्ध विकास


ज व मा./गृह योजना/पेठ क्र.१२व ३०-३२/ 4692 दिनांक:- 12 DEC 2025

## परिपत्रक

विषय: पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणाऱ्या पेठ क्र. १२ व पेठ क्र.३०-३२ गृहयोजनेतील सदनिकांच्या लॉटरीबाबत

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून पेठ क्र. १२, भोसरी व पेठ क्र. ३०-३२, वाल्हेकरवाडी येथील अंदाजे ८३३ शिल्लक सदनिकांची लॉटरी पद्धतीने सोडत राबविण्याची प्रक्रिया दि. १५ डिसेंबर २०२५ पासून सुरु करण्यात येणार आहे. सदरची लॉटरी संपूर्णपणे Online पद्धतीने होणार आहे. यासाठी खालील कागदपत्रे लाभार्थ्यांनी सादर करणे आवश्यक आहे.

१. अर्जदाराने स्वत:चे आधार कार्ड, Pan Card व विवाहित असल्यास पती/पत्नी या दोघांचे आधारकार्ड, Pan Card सादर करणे आवश्यक.

२. लाभार्थी यांनी वास्तव्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सन २०१८ नंतरचे सादर करणे आवश्यक आहे.

३. उत्पन्नाच्या स्त्रोताकरिता खालीलप्रमाणे सादर केलेल्या पात्र उत्पन्न गटानुसार लाभार्थी यांनी आर्थिक वर्ष दि. ०१.०४.२०२४ ते ३१.०३.२०२५ मधील आयकर विवरणपत्र अथवा दि. ०१.०४.२०२४ ते दि. ३१.०३.२०२५ तहसीलदार/नायब तहसीलदार यांनी निर्गमित केलेला उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

४. आरक्षण प्रवर्गाकरिता जातीचा दाखला तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक.

५. पेठ क्र.१२ व पेठ क्र.३०-३२ गृहयोजनेतील सदनिकांच्या किंमती खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेले आहे.

| पेठ क्र.१२ | |
|---|---|
| EWS | १७,३१,९२६/- |
| LIG | ३८,६८,४५५/- |
| पेठ क्र.३०-३२ | |
| EWS | २२,७३,७१३/- |
| LIG | ३०,८०,०२६/- |

Scanned with OKEN Scanner

६. लाभार्थी यांनी खालील अनामत रक्कम भरणा करणे आवश्यक आहे.

| अनु.क्र. | उत्पन्न गट | अनामत रक्कम | अर्जासोबत भरावयाची रक्कम Form Fee +GST+अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १. | अत्यल्प उत्पन्न गट (EWS) | रु. ५०००/- | रु. ५७०८/- |
| २. | अल्प उत्पन्न गट (LIG) | रु. १०,०००/- | रु. १०,७०८/- |

७. अर्जदाराचे स्वत: चे बँक खाते नसल्यास अर्जदाराने स्वत:चे बँक खाते उघडणे आवश्यक आहे.

८. पेठ क्र.१२, भोसरी व पेठ क्र.३०-३२, वाल्हेकरवाडी या योजनांसाठी Online अर्ज भरावयाच्या पद्धतीकरिता अर्जदाराने प्रथम http:housing.pmrda.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी तसेच अर्जदार यांनी सदर संकेतस्थळावर नोंदणी करून, अनामत रक्कम व फॉर्म फी चा भरणा करावा व तदनंतर परिपूर्ण अर्ज भरून सबमिट करावा. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२०-२७१६६००० संपर्क साधावा. फक्त अनामत रक्कम भरणा संबंधी संपर्क – ७०६६०४७२१२, ७२६२००३०८४ संपर्क साधावा.

(स्थळप्रतीवर मा. सह आयुक्त, जमीन व मालमत्ता विभाग यांची स्वाक्षरी असे)

१२.१२.२४

(हिम्मत खराडे)
उप आयुक्त
जमीन व मालमत्ता विभाग
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
पुणे

Scanned with OKEN Scanner